श्री हैदर याकुब पटेल,ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत सात्रळ,ता.राहुरी यांना
ग्रामपंचायत अधिकारी या पदावरुन तात्पुरते
दुर करणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक- साप्रवि-२/ग्रापं-३/३९५ /२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ :- १.गटविकास अधिकारी पंचायत समिती राहुरी यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/१५७/२०२६, दिनांक ०२/०७/२०२६.
२.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सीडीआर १०९९/प्र.क्र.६२/९९/११अ, मुंबई दिनांक ०३ एप्रिल,२०००

संदर्भ क्र.१ अन्वये गटविकास अधिकारी पंचायत समिती राहुरी यांनी संदर्भीय पत्रानुसार, श्री हैदर याकुब पटेल, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत सात्रळ,ता.राहुरी यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर यांनी कार्यवाही करुन राहुरी, पोलीस स्टेशन, गु.र.नं. ७५३/२०२६ प्रमाणे दिनांक- ०१/०७/२०२६ रोजी गुन्हा दाखल केलेबाबत कळविले आहे.

सबब, मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चा नियम ३ चे १(ब) व संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयामधील मुद्दा क्रमांक ०७ (ब) अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन श्री हैदर याकुब पटेल,ग्रामपंचायत अधिकारी, यांना दिनांक- ०१/०७/२०२६ पासून जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करीत आहे.

पुढे असाही आदेश देत आहे की, निलंबन काळात श्री हैदर याकुब पटेल,ग्रामपंचायत अधिकारी, यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहन अवधी स्वियेत्तर सेवा निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांचे काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ (१) नुसार मुळ वेतनाच्या ५० टक्के व त्यावर आधारीत महागाई भत्ता व इतर मिळणारे भत्ते जिल्हा परिषदेच्या सेवेतून सेवा निलंबित केल्यापासून मिळणेस पात्र राहील.

त्याप्रमाणे, निलंबनाचे कालावधीत, श्री हैदर याकुब पटेल,ग्रामपंचायत अधिकारी, यांना खाजगी नोकरी, खाजगी धंदा व व्यवसाय करीत नाही. जर त्यांनी सेवा निलंबन काळात नोकरी, धंदा व इतर व्यवसाय केल्यास ती गैरवर्तणूक होऊन व त्या कारणासाठी ते शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच श्री हैदर याकुब पटेल,ग्रामपंचायत अधिकारी, हे निर्वाह भत्ता मिळण्याचा हक्कही गमावतील. जो पर्यंत निलंबनाचा आदेश अस्तित्वात आहे. तो पर्यंत श्री हैदर याकुब पटेल,ग्रामपंचायत अधिकारी, मुख्यालय पंचायत समिती-श्रीरामपूर येथे राहील. श्री हैदर याकुब पटेल,ग्रामपंचायत अधिकारी, यांना गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर यांचे पुर्व मंजूरी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही अथवा त्यांना गैरहजर राहता येणार नाही. जर गैरहजर राहीले तर ती कृती गैरवर्तणूक ठरेल आणि श्री हैदर याकुब पटेल, ग्रामपंचायत अधिकारी, हे शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहतील.

गटविकास अधिकारी,पंचायत समिती श्रीरामपूर यांनी श्री हैदर याकुब पटेल, ग्रामपंचायत अधिकारी, यांना निर्वाह भत्ता देण्यापुर्वी महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा निलंबन बडतर्फी व

सेवेतून काढून टाकणे यांचे काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६९ (१) अनुसार प्रत्येक महिन्यास प्रमाणपत्र घ्यावे.

या आदेशाची नोंद श्री हैदर याकुब पटेल,ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मूळ सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०७२९०६०९०८ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 29-07-2026 16:27:44

(आनंद भंडारी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री हैदर याकुब पटेल,ग्रामपंचायत अधिकारी,ग्रामपंचायत सात्रळ,ता.राहुरी,जि.अहिल्यानगर

व्दारा व प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी.

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी, जि. अहिल्यानगर

२/-सदर आदेश संबंधितांना तात्काळ बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी व सदरची प्रत उलट टपाली या कार्यालयास विना विलंब सादर करावी.

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर जि.अहिल्यानगर यांना पुढील कार्यवाहीसाठी

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- ग्रामपंचायत, आस्थापना कार्यासन- ग्रापं-१, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना पुढील कार्यवाहीसाठी